# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in Distress Situation**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **21/09/2022**

**Brief of the work done :-**

'निर्भया_पथक' व 'सास' च्या समन्वयातून निराधार रंजनाला मिळाला आधार ; पो.स्टे. कारंजा शहर पोलिसांनी घडविले माणुसकीचे दर्शन.

## निर्भया पथक व सास च्या समन्वयातुन रंजनाला मिळाला सहारा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ■ कारंजा येथील सराफ लाईन मध्ये एक बेवारस महीला काही दिवसापासुन राहत होती. हि महीला या परीसरातील महाराष्ट्र हार्डवेअर जवळ राहत असल्याने हार्डवेअर मालक इकबाल अकबानी यांनी तिची एखादया बहीनीप्रमाणे सेवा केली. या महीलेला कोणीही नातेवाईक नसल्याचे लक्षात आल्यानंतर सदर महिलेसंदर्भात जाकीर शेख यांनी सर्वधर्म आपातकालीन संस्थेला व पोलिसांना माहिती दिली.

- **इकबालने केली रंजनाची बहीनीप्रमाणे सेवा**
- **वाशिम येथील सखी वन स्टाप सेंटर मध्ये रवानगी**

त्यानंतर सास व पोलिसांच्या निर्भया पथकाच्या प्रयत्नाने अखेर बेसहारा रंजनाला हक्काचा सहारा मिळाला. पोलिसांनी तिची रवानगी वाशिम येथील माधवराव इंगोले यांच्या मदतीने महीला बहुदेशीय विकास संस्थेच्या सखी वन स्टाप सेंटरमध्ये केली असुन येथे त्या महीलेला पाठविण्यात आले. त्यापुर्वी कारंजा उपजिल्हा रूग्णालयात वैद्यकीय अधिक्षक डॉ भाउसाहेब लहाने यांनी तिच्यावर प्रथोमपाचार केले. यासाठी सास चे अध्यक्ष श्याम सवाई, कारंजा शहर पोस्टे चे ठाणेदार आधारसिंग सोनोने, पोलिस कर्मचारी मिथुन सोनोने, महिला पोलिस कर्मचारी पुजा काटे व अर्चना पत्रे यांचे सहकार्य लाभले. या महिलेला निरोप देताना बहिनीप्रमाणे सेवा करणारे इकबाल अकबानी भावुक झाल्याचे देखील दिसुन आले. या घटनेवरून पुन्हा एकदा कारंजात जातीय सलोख्याचे दर्शन घडले. (ता.प्र.)